स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था (मपमविवि),
मूर्तीजापूर रोड, कृषिनगर, अकोला-४४४१०४

जा. क्र. :/स्नापपविसं/मुलांचे वसतिगृह /ठेका/ ०२ /२०२४ दिनांक : ०६ / १२/२०२४

# दरपत्रक मागविण्याची सूचना

**विषय:** ठेके पद्धतीने मुलांच्या वसतिगृहातील स्वच्छतागृहे स्वच्छतेचे काम करण्यासाठी सीलबंद दरपत्रक मागविणेबाबत......

स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला येथील मुलांच्या वसतिगृहातील स्वच्छतागृहे, वरांडे व पायऱ्या दैनंदिन स्वरुपात स्वच्छ करण्याचे काम ठेका पद्धतीने करायची आवश्यकता आहे.

कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **कामाचे स्वरूप** | **दर (रुपये)** |
|---|---|
| १) स्वच्छता गृह (९ संडास, ८ स्नानगृह) स्वच्छ करणे.<br>२) तळ मजला व पहिल्या मजल्यावरील वरांडे व पायऱ्या स्वच्छ करणे.<br>(कालावधी ६ महिने) | ------------------- प्रती माह |

**कामगार विषयक अटी व शर्ती:**

१. ठेकेदारास प्रती माह देयक अदा करण्यात येईल.

२. नियमावली यांच्या पूर्ततेची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची असेल व यासाठी संस्था कुठल्याही पद्धतीने जबाबदार राहणार नाही.

३. ठेकेदारास स्वतःचे बँक खाते व आधार कार्ड असणे आवश्यक आहे.

४. दरपत्रक/ दरपत्रके स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे पूर्ण अधिकार मा. सहयोगी अधिष्ठाता, स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला यांना राहतील.

५. दरपत्रकावर तसेच सदर दरपत्रक ज्या लिफाफ्यात सीलबंद केले आहे त्या लिफाफ्यावर ठळक अक्षरांत दरपत्रक- मजूर ठेका - मुलांचे वसतिगृह असे लिहावे.

६. दरपत्रकावर तसेच सदर दरपत्रक ज्या लिफाफ्यात सीलबंद केले आहे त्या लिफाफ्यावर या दरपत्रक मागविण्याच्या सूचनेचा क्रमांक संदर्भ क्रमांक म्हणून लिहावा.

७. संबंधित अधिकाऱ्यांनी, वरिष्ठांनी वेळोवेळी सांगितलेली कामे पार पाडणे.

८. हा कंत्राट तात्पुरता असून आपणास केव्हाही पूर्वसूचना न देता कामावरून कमी करण्यात येईल.

९.सीलबंद दरपत्रके **सहयोगी अधिष्ठाता,** स्नातकोत्तर **पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था** (स्नापपविसं), **कृषिनगर, अकोला-४४४१०४** या पत्यावर दिनांक १३/१२/२०२४ च्या सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

**सहयोगी अधिष्ठाता**
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था
अकोला-४४४१०४

**प्रत:**

सूचना फलक - स्नापपविसं, अकोला / मुलांचे वसतिगृह / वाचनालय / निम्न शिक्षण विभाग / शैक्षणिक पशुचिकित्सा संकुल / स्नापपविसं, अकोला

मा. सहयोगी अधिष्ठाता यांचे तांत्रिक अधिकारी, स्नापपविसं, अकोला यांनी सदर सूचना विस्तृत प्रसिद्धीसाठी विद्यापीठाच्या, महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर तात्काळ प्रकाशित करण्यास्तव योग्य कार्यवाही करावी, ही विनंती.

फर्मचे नाव / लेटर हेड

---

<u>हमीपत्र</u>

मी/आम्ही निम्न स्वाक्षरीकार मे ______________________________
पत्ता ______________________________________________

हमिपत्र लिहून देतो कि, आपल्या कार्यालयाकडून प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात क्र.______________________ मध्ये नमूद साहित्य/सेवा पुरविण्या करीता मी/आम्ही इच्छुक आहे/आहोत. सदर जाहिराती करीता मी/आम्ही फक्त एकच दरपत्रक/निविदा सादर केले आहेत. तसेच जाहिरात प्रसिद्ध करणाऱ्या कार्यालयाशी आणि त्या कार्यालयातील कोणत्याही व्यक्तीशी माझे कुठलेही हित संबंध नाहीत.

फर्मचा सही व शिक्का